




सेल्फी काढून वाहतूक पोलिसांना शुभेच्छा देताना अभिनेता स्वप्नील जोशी. (दुसऱ्या छायाचित्रात) हेल्मेट जनजागृतीविषयी माहिती देताना रितू छाब्रिया, रश्मी शुक्ला, सुनील रामानंद.

# पोलिसांची हेल्मेट जनजागृतीसाठी दुचाकी रॅली

**पुणे : प्रतिनिधी**

हेल्मेट वापरासाठी राष्ट्रीय रस्ता सुरक्षा अभियानामध्ये पुणे पोलिसांकडून हेल्मेट वापराबाबत जनजागृतीसाठी करण्यासाठी १५ जानेवारीला संपूर्ण शहरात दुचाकी रॅलीचे आयोजन करण्यात आले आहे. त्यासाठी नागरिकांनी जास्तीत जास्त सहभाग नोंदवावा व हेल्मेट वापर करावा, असे आवाहन पुणे पोलिस आयुक्त रश्मी शुक्ला यांनी शुक्रवारी पत्रकार परिषदेमध्ये केले.

या वेळी सहआयुक्त सुनील रामानंद, फिनोलेक्सच्या संचालिका रितू छाब्रिया, गल्फ कंपनीचे विनायक जोशी उपस्थित होते.

शहरात वाहनांवर 'रस्ता सुरक्षा अभियान-२०१७' चे स्टिकर लावण्यात येत आहेत. शहरात नेहरू रस्त्यावरील बाहुबली चौक येथे प्रसिद्ध अभिनेता स्वप्नील जोशी यांनी वाहनांवर स्टिकर लावून समर्थ वाहतूक विभागातील पोलिस कर्मचाऱ्यांना शुभेच्छा दिल्या.

पुणे शहर पोलिसांकडून शहरात राष्ट्रीय रस्ता सुरक्षा अभियान राबविण्यात येत आहे. या अभियानात वेगवेगळ्या माध्यमातून नागरिकांमध्ये सुरक्षिततेबाबत जनजागृती करण्यात येणार आहे. हेल्मेट वापराबाबत जनजागृती करण्यासाठी १५ जानेवारीला शहरात आयोजित करण्यात आलेल्या दुचाकी रॅलीमध्ये हेल्मेट घालून सुमारे एक हजार नागरिक, पोलिस आणि दुचाकी रायडर सहभागी होणार आहेत. या वेळी फिनोलेक्स आणि गल्फ ऑईल ल्युब्रिकंट्सच्या वतीने १६५० कर्मचाऱ्यांना हेल्मेट्स आणि मास्कचे वाटप करण्यात येणार आहे. या रॅलीला पुणे पोलिस मुख्यालय येथून सुरुवात होणार आहे. ही रॅली साधारण ३६ किलोमीटरची असल्याचे वाहतूक विभागाच्या वतीने सांगण्यात आले.

रॅलीची सुरुवात शिवाजीनगर मुख्यालयातून सकाळी सात वाजता होणार आहे. मुख्यालयातून डावीकडे वळून वीर चाफेकर, सूर्यमुखी चौक, पुणे विद्यापीठ चौकातून सरळ ब्रेमन चौकातून औंध रोडने स्पायसर कॉलेज, आंबेडकर चौक, साई चौक, चर्च अंडरपास येथून डावीकडे वळून सरळ जुना पुणे-मुंबई रोडने पोल्ट्री चौक, मुळा रोडवरून होळकर ब्रिज, सादलबाबा चौक, गुंजन चौक, रामवाडी, फिनिक्स मॉल येथून यूटर्न घेऊन कल्याणीनगर जंक्शन, एबीसी चौक, कोरेगाव पार्क, ब्ल्यू डायमंड चौक, साधू वासवानी ब्रिजवरून, सर्किट हाऊस, भैरोबानाला, सोलापूर बाजार चौकी, धोबी घाट, स्वारगेट जेधे चौक, सारसबाग, टिळक रोडने गांजवे चौक, सेनादत्त चौकी, म्हात्रे ब्रिज, नळस्टॉप, कर्वे रोडने सरळ खंडोजीबाबा चौक, फर्ग्युसन रोड, तुकाराम पादुका चौकातून सरळ चाफेकर चौक पुलाखालून सिमला चौकातून यूटर्न घेऊन पुन्हा शिवाजीनगर मुख्यालयात या रॅलीचा समारोप होणार आहे.